# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:06.09.2025** **वार:शनिवार**

1. शिक्षकदिनी महाराष्ट्रातील सहा शिक्षक राष्ट्रीय पुरस्कारानं सन्मानित
2. इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अराघची आणि युरोपिय महासंघाच्या परराष्ट्र धोरण प्रमुख काया काहलस यांच्यात तेहरानच्या आण्विक प्रश्नासंदर्भात चर्चा
3. वस्तू आणि सेवा कर परिषदेनं केलेल्या दर सूसुत्रीकरणामुळं वाहन उद्योग क्षेत्राला मोठा फायदा होणार असल्याचा अंदाज आणि
4. अमेरिकी खुल्या टेनिस स्पर्धेच्या उपांत्य फेरीत, सर्बियाच्या नोवाक जोकोविचवर विजय मिळवत स्पेनच्या कार्लोस अल्काराझचा अंतिम फेरीत प्रवेश

**<u>शिक्षकदिन-राष्ट्रपती</u>**

ज्येष्ठ शिक्षणतज्ञ आणि माजी राष्ट्रपती डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती काल देशभरात शिक्षक दिन म्हणून साजरी करण्यात आली. नवी दिल्लीतल्या विज्ञान भवन इथं आयोजित समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते 45 शालेय शिक्षक, 21 उच्च शिक्षण आणि 16 कौशल्य विकास क्षेत्रातील शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. यात महाराष्ट्रातल्या सहा शिक्षकांचा समावेश होता. मुंबईच्या सोनिया कपूर, नीलाक्षी जैन, लातूरचे डॉ. संदीपन जगदाळे, बारामतीचे डॉ. पुरुषोत्तम पवार, नागपूरचे अनिल जिभकाटे आणि नांदेडचे डॉ. शेख मोहम्मद वक़िउद्दीन शेख हमीदोद्दीन यांना काल सन्मानित करण्यात आलं. सर्व पुरस्कार प्राप्त शिक्षकांना प्रमाणपत्र, रौप्य पदक आणि 50 हजार रुपयांचं रोख बक्षीस प्रदान करण्यात आलं. यावेळी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान उपस्थित होते. या समारंभात मार्गदर्शन करताना राष्ट्रपतींनी सावित्रीबाई फुले यांच्या योगदानाचा उल्लेख करत भारताला कौशल्याची राजधानी आणि जागतिक महासत्ता बनवण्यात शिक्षकांची भूमिका निर्णायक असल्याचं सांगितलं.

**<u>शिक्षक दिन-पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल शिक्षक दिनानिमित्त केंद्रीय मंत्री सावित्री ठाकूर यांनी लिहिलेला एक लेख सामायिक केला आहे. सावित्रीबाई फुले यांच्या उल्लेखनीय योगदानावर या लेखात प्रकाश टाकण्यात आला आहे. देशाच्या आकांक्षांना सावित्रीबाई फुले यांचा वारसा प्रेरणा देत आहे, असं पंतप्रधानांनी एक्स या समाज माध्यमावरील संदेशामध्ये म्हटलं आहे. विकसित भारत 2047 चं स्वप्न, शिक्षणाद्वारे महिलांना राष्ट्र उभारणीमध्ये समान भागीदार म्हणून सक्षमीकरणावर आधारित असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं.

**<u>मांडविय</u>**

पंजाब आणि हिमाचल प्रदेशातील पूरग्रस्त भागात बचाव कार्य करण्यासाठी हजारोंहून अधिक प्रशिक्षित माय भारत आपदा मित्रांना तैनात केलं जाईल, असं केंद्रीय क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री डॉक्टर मनसुख मांडविय यांनी काल सांगितलं. नवी दिल्लीतील माय भारत मुख्यालयात उच्चस्तरीय बैठकीला संबोधित करताना, मांडविय यांनी माय भारत स्वयंसेवक आणि जिल्हा युवा अधिकाऱ्यांना जिल्हाधिकाऱ्यांशी समन्वय साधून बाधितांना वेळेवर मदत पोहोचवण्याची विनंती केली. स्वयंसेवा आणि

अनुभवात्मक शिक्षणाद्वारे तरुणांना जोडण्यासाठी, आणि सक्षम करण्यासाठी तयार करण्यात आलेलं माय भारत हे एक देशव्यापी व्यासपीठ आहे.

**सिंदूर**

लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी काल नवी दिल्ली इथं निवृत्त लेफ्टनंट जनरल केजेएस ढिलियन यांनी लिहिलेल्या 'ऑपरेशन सिंदूर: द अनटोल्ड स्टोरी ऑफ इंडियाज डीप स्ट्राइक्स इनसाईड पाकिस्तान' या पुस्तकाचं प्रकाशन केलं. याप्रसंगी बोलताना लष्कर प्रमुख म्हणाले की, हे पुस्तक केवळ लष्करी कारवाईचं वर्णन नसून भारतीय सैन्य आणि राष्ट्राच्या धैर्य, व्यावसायिकता आणि साहसाची कहाणी आहे. ऑपरेशन सिंदूरदरम्यान, भारतीय सैन्य एका लयबद्ध लाटेसारखं काम करत होतं असं सांगून जनरल द्विवेदी पुढं म्हणाले की, हे पुस्तक शैक्षणिक अभ्यासक आणि संशोधकांसाठी एक संदर्भ साहित्य ठरू शकतं.

**गणेश विसर्जन**

महाराष्ट्रात गेले दहा दिवस सुरू असलेल्या गणेशोत्सवाच्या मंगल पर्वाची सांगता आज गणेश विसर्जनानं होणार आहे. सार्वजनिक गणेश मंडळं तसंच घरगुती गणेश मुर्तींचं विसर्जन आज होणार आहे. यासाठी विविध शहरांत स्थानिक प्रशासनानं सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. हा उत्सव पर्यावरणपूरक पद्धतीनं राबवण्यासाठी कृत्रिम विसर्जन कुंड, निर्माल्य कुंडांची व्यवस्थाही करण्यात आली आहे. विसर्जन मिरवणूक सुरळीतपणे पार पाडण्यासाठी मुंबई पुण्यासह सर्वच शहरांमध्ये पोलीस यंत्रणा देखील सज्ज आहे.

**इराण**

इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अराघची आणि युरोपिय महासंघाच्या परराष्ट्र धोरण प्रमुख काया काहलस यांनी तेहरानच्या आण्विक प्रश्नासंदर्भातील चालू घडामोडींवर चर्चा केली. फ्रान्स, ब्रिटन आणि जर्मनी यांनी इराणवरील आंतरराष्ट्रीय निर्बंध पुन्हा सुरू करण्यासाठी एक यंत्रणा सुरू करण्यात पुढाकार घेतल्यानंतर गुरुवारी संध्याकाळी कतारची राजधानी दोहा इथं ही चर्चा झाल्याचं, इराणच्या परराष्ट्र मंत्रालयानं काल म्हंटलं आहे. अराघची आणि काहलस यांनी आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेशी इराणच्या सहकार्यावरही विचार विनिमय केला. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचे इराणवरील उठवलेले निर्बंध पुन्हा लागू करण्यासाठी ब्रिटन, फ्रान्स आणि जर्मनीनं यंत्रणा सुरू करण्याच्या हालचाली बेकायदेशीर आणि अन्याय्य असल्याचं अराघची यांनी म्हंटलं आहे. तर काहलस यांनी, सर्व पक्षांच्या चिंता दूर करण्यासाठी संवाद आणि वाटाघाटी हाच एकमेव मार्ग असल्याचं म्हंटलं आहे.

**जीएसटी-वाहन उद्योग**

वस्तू आणि सेवा कर परिषदेनं केलेल्या दर सूसुत्रीकरणामुळं वाहन उद्योग क्षेत्राला मोठा फायदा होणार असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. चार स्तरीय कररचना आता दोन स्तरीय करण्यात आली आहे. त्यामुळं लहान कार आणि साडेतीनशे सीसीपेक्षा कमी क्षमतेच्या मोटरसायकलींवरील करात दहा टक्के कपात झाल्यानं त्यांच्या किंमती कमी होण्याचा अंदाज आहे. त्यामुळं गरीब आणि मध्यमवर्गीयांवरील आर्थिक भार कमी होण्याचा अंदाज आहे. तसंच सुट्या भागांवरील जीएसटी कमी होणार आहे. विद्युत वाहनांवर 5 टक्के इतका कमी, तर आरामदायी श्रेणीतल्या वाहनांवर 40 टक्के जीएसटी आकारण्यात येणार आहे. एकंदरीत या करकपातीमुळं दळणवळणावर मोठा परिणाम होणार असल्यानं कृषी, सिमेंट, स्टील आणि ई कॉमर्सशी निगडीत वस्तू पुरवठा स्वस्त होऊ शकेल. सोसायटी ऑफ इंडियन ऑटोमोबाईल मॅन्युफॅक्चरर्सचे महासंचालक राजेश मेनन यांनी या सुधारणांचं स्वागत करून देशांतर्गत आणि निर्यात दोन्ही क्षेत्रातील मागणीत वाढ होण्याची आशा व्यक्त केली आहे. यामुळं जागतिक स्तरावर वाहन उद्योगातील उत्पादन केंद्र म्हणून भारताचं स्थान भक्कम होण्यास हातभार लागणार आहे.

**निर्मला सीतारामन**

भारत रशियाकडून तेल खरेदी सुरूच ठेवेल असं सांगून केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी असे निर्णय केवळ राष्ट्रीय हिताच्या आधारावर घेतले जाणार असल्याचं अधोरेखित केलं. एका दूरचित्रवाणी वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्या म्हणाल्या की,

रशियन तेल अथवा इतर कोणत्याही बाबतीत, दर आणि सुलभते संदर्भात देशाच्या गरजांवर आधारित निर्णय घेतला जाईल. देशाच्या आयात खर्चात कच्च्या तेलाचा वाटा सर्वाधिक असल्याचा त्यांनी पुनरुच्चार केला. 50 टक्के अमेरिकन शुल्कामुळे प्रभावित झालेल्या निर्यातदारांना मदत करण्यासाठी सरकार उपाययोजनांवर काम करत असल्याचं सांगून निर्यातदारांसाठी एक पॅकेज तयार केलं जात आहे, असं त्या म्हणाल्या. आत्मनिर्भर भारताचं उद्दिष्ट केवळ देशात सर्वकाही उत्पादन करणे नाही तर अनिश्चित जागतिक व्यापार धोरणांच्या पार्श्वभूमीवर स्वाभिमान राखणे देखील आहे, असंही त्यांनी सांगितलं.

**परकीय चलन**

भारताच्या परकीय चलन साठ्यात अंदाजे साडेतीन अब्ज डॉलर्सची वाढ नोंदवण्यात आली आहे. 29 ऑगस्टला संपलेल्या सप्ताहातली ही वाढ असून, हा साठा एकंदर 694 अब्ज डॉलर्सपेक्षा थोडा अधिक आहे. रिझर्व बँकेनं जारी केलेल्या आकडेवारीनुसार या साठ्याचा प्रमुख घटक असलेली परकीय चलन मालमत्ता देखील जवळपास 584 अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक असून त्यात साधारण दीड अब्ज डॉलर्सपेक्षा थोडी जास्त वाढ नोंदवण्यात आली आहे. सोन्याच्या साठ्यातही वाढ नोंदवण्यात आली असून ती साडे शह्याऐंशी अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक आहे.

**टेनिस**

अमेरिकी खुल्या टेनिस स्पर्धेमध्ये, स्पेनच्या कार्लोस अल्काराझनं 24 ग्रँड स्लॅम विजेत्या सर्बियाच्या नोवाक जोकोविचवर विजय मिळवत पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. त्यानं उपांत्य फेरीचा सामना 6-4, 7-6, 6-2 असा सरळ सेटमध्ये जिंकला. अंतिम फेरीत, अल्काराझची लढत, इटलीचा जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेला आणि गतविजेता यानिक सिन्नर आणि कॅनडाचा फेलिक्स ओजे-अलियासिम यांच्यातील दुसऱ्या उपांत्य फेरीच्या विजेत्याशी होईल.

**हवामान**

भारतीय हवामान विभागानं आज पूर्व राजस्थान, गुजरात, कोकण, मध्य महाराष्ट्र आणि पश्चिम मध्य भारतात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. ईशान्य भारत, ओडिशा, तामिळनाडू, बंगाल, सिक्कीम आणि राजस्थानमधील काही ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. जम्मू, काश्मीर, लडाख, मुझफ्फराबाद, बिहार, हिमाचल प्रदेश आणि तेलंगणमध्येही विजांसह वादळी वाऱ्यांचा अंदाज वर्तवला आहे. अंदमान आणि निकोबार बेटे, झारखंड, मराठवाडा, तामिळनाडू पुडुचेरी आणि कराईकल इथंही अशीच परिस्थिती राहण्याची शक्यता आहे. दिल्लीमध्ये दिवसभर मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.